# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहाय्यक आयुक्त ', एस विभाग यांचे कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, एस विभाग,**
**मंगतराम पेट्रोल पंपाजवळ, लालबहादुर शास्त्री मार्ग.भांडुप (प), मुंबई -400078.**

क्र. सआएस /ओडी/ 480 /अति.निर्मु., दिनांक 27.01.2021.

## जाहिर लिलाव नोटीस

माहे. ऑगस्ट 2018 ते डिसेंबर 2019 या दरम्यान अतिक्रमण निर्मुलन एस विभागाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करून जप्त केलेल्या अनाशिवंत वस्तूंचा जाहिर लिलाव मा. सहाय्यक आयुक्त 'एस' विभाग यांच्या सआएस/ ओडी/479/ अतिक्रमण निर्मुलन / दि. 27.01.2021 अन्वयेच्या मंजुरीने **दि. 05.02.2021** रोजी सकाळी 11.00 वा. 'टी' विभाग, अतिक्रमण निर्मूलन गोदाम डंपिंग रोड, मुलुंड (प.), मुंबई 400080 येथे आयोजित केलेला आहे. सदर लिलावा दरम्यान यादीनुसारच्या अनाशिवंत वस्तू, तोडमोड करण्यात आलेल्या हातगाडया, लोखंडी / लाकडी स्टॉल इच्छूक बोलीधारकांना पडताळणी करीता समदिनांकाला सकाळी 10.00 ते 11.00 या दरम्यान वरिष्ठ निरीक्षक अतिक्रमण निर्मुलन, लेखा अधिकारी, सहाय्यक सुरक्षा अधिकारी व वाहन निरीक्षक यांच्या समवेत उपरोक्त नमूद ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातील.

- **जाहिर लिलावाच्या खरेदी करीता अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

**1)** प्रत्येक इच्छूक बोलीधारकाने परत फेडीची रूपये 20000/- (वीस हजार) अनामत रक्कम रोखीने जमा करावयाची असून, सदर रक्कमेचा परतावा अयशस्वी बोलीधारकांस त्याच ठिकाणी केला जाईल.
**2)** प्रत्येक इच्छूक बोलीधारकाने पॅन कार्ड (Pan Card) व आधार कार्ड (Aadhar Card) ची छायांकित प्रत प्रस्तूत करणे आवश्यक आहे.
**3)** 'असेल त्या अवस्थेतील' वस्तू उच्चतम रकमेच्या बोलीधारकांना रोख रकमेच्या बदल्यात देण्यात येतील.
**4)** यशस्वी बोलीधारकाने बोली करण्यात आलेल्या रकमेच्या 18 % GST (GST + SST) लिलावाच्या दिवशी अदा करणे बंधनकारक असेल.
**5)** यशस्वी बोलीधारकाने जे.सी.बी.चे भाडे, गॅस कटरचे भाडे अदा करणे बंधनकारक असेल.
**6)** लिलावाच्या वस्तू उच्चतम बोलीधारकांना फक्त 2 दिवसामध्ये कार्यालयीन वेळेत सूपुर्द करण्यात येतील.
**7)** संबंधीत आस्थापना स्विकार (Accept) / अस्विकार (Reject) बोली रद्द (Bid Cancel) किवा पुढील तारखेस ठेवण्याचे (Postpone) हक्क स्वतःकडे राखून ठेवत आहे.

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'एस' विभाग**